
# शब्दशिल्प®

(मराठी सुविचार)

विलास जैन



“जंगलात लागलेली आग,
वादळात सापडलेली नाव,
गोंधळात पडलेली व्यक्ति,
नियंत्रीत करणे कठिण असते”

NEW ERA'S SELF HELP

हे कार्य नाही क्रांति आहे

# समर्पण

हा ‘शब्दशिल्प’ मराठी सुविचार संग्रह

सर्मपीत आहे,

निर्सगाच्या त्या रक्षकांसाठी

जे ह्या धरतीला

त्यांची संपत्ती नाही,

तर त्यांच्या भावी पिढीची

ठेव मानतात.

आपणापासून मला प्रेरणा मिळते.
विलास जैन

# अल्प परीचय - विलास जैन

विलासभाऊ जैन यांचा जन्म एका छोट्याश्या खेड्यात झाला. खेडे गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांना छोट्या वयातच गाव सोडून शहरात शिक्षणासाठी जावे लागले. त्यांना कोणाचेही मार्गदर्शन नसतांना त्यांनी शिक्षणाचे माहेरघर पुणे येथुन एका नामवंत संस्थेतून १९८८ साली एम.बी.ए. (मार्केटींग) या विषयात शिक्षण पुर्ण केले व त्यानंतर स्वत:चा चिपकविण्याचे पदार्थ विकण्याचा एक आगळा वेगळा व्यवसाय सुरु केला. सुरुवातीला फक्त विक्रीचा व्यवसाय केला व त्यानंतर त्या वस्तु स्वत: बनविण्याचा कारखाना टाकला. त्यांचे व्यक्तिमत्व अभ्यासू असून आज ते एक दुरदर्शी प्रगतशील उद्योजक आहेत. त्यांनी चिपकविण्याच्या विषयात दोन शोध लावलेत व अनेक उत्पादने स्वत: तयार केलीत. आज ते एक सफल उद्योजक, संशोधक, शेतकरी, समाजकारणी, राजकारणी तर आहेत पण एक उत्कृष्ट साहित्यिक देखील आहेत. त्यांचे लिखाण हिंदी व मराठी भाषेत असून संपुर्ण लिखाण समाजपयोगी, सुसंस्कार घडविणारे, प्रेरणा देणारे, अध्यात्मिकतेचा आधार असलेले व नैतिक मुल्य मनावर बिंबवणारे आहे. त्यांनी हिंदी व मराठी दोन्ही भाषेमध्ये बालकविता, प्रेरणा कविता, देशभक्तीपर कविता, विळंबन कविता, कव्वाली, दोहे, प्रेरणा शायरी, सुविचार, सिनेगित, उखाने, भजन, आध्यात्मिक कविता, ग्रह ताऱ्यांवरील कविता, समाज रचनेवरील कविता, छोट्या शिषशाप्रद गोष्टी, मराठी गझल लिहलेल्या आहेत. त्यांची एकुण सात पुस्तके प्रकाशित व तीन प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांची सामाजिक, राजकीय व अध्यात्मिक विषयाची दिर्घ वाटचाल त्याबरोबर खेड्यात तसेच शहरातील वातावरणात घालावलेली वर्षे त्यांना आपल्या लिखाणात फार महत्त्वाचे ठरलेली आहेत. निसर्गाशी जिवापाड प्रेम असल्यामुळे त्यांनी हजारो वृक्ष लावलेली आहेत आणि लिखाणापासून मिळणारा सर्व पैसा निसर्ग संवर्धना करीता वापरण्याचा प्रण त्यांनी केलेला आहे.

हे कार्य नाही क्रांति आहे

# शब्दशिल्प®

मराठी सुविचार


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन | : | प्रथम |
| प्रकाशक | : | विलास जैन |
| लेखक | : | विलास जैन |
| प्रति | : | १००० |
| अक्षरांकन | : | विलास जैन |
| निर्मित | : | विलास जैन |
| मुद्रक | : | विश्वरुपा प्रिंटस्, जळगाव. |



© All Right Reserved 2013
New Era Self Help Marketing India Ltd. is registered in India under Public Ltd. Company
Act 1956 Reg. No. U51909 MH2002 PLC 138100

सर्वाधिकार :

या सुविचार संग्रहातील सर्व भाग, चित्र, लिखान पुर्व परवानगीशिवाय पुनर्मुद्रित केले जाणार नाहीत. या प्रकाशनाबाबत अनधिकृत काही प्रकाशन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.


हे कार्य नाही क्रांति आहे

# प्रस्तावना

जीवनात संघर्ष करते वेळी अनेक कविता, काही शब्द समूह, सुविचार आपली लढण्याची शक्ती वाढवितात. हारत असलेली आपली बाजू जिंकण्यात, आपला आत्मविश्वास वाढविण्यास असे साहित्य आपली मदत करतात. जीवनातल्या अनेक वळणावर ते आपल्याला चांगले मार्ग दाखवितात आणि आपल्याला जीवन जगण्याची प्रेरणा देतात. मला माझ्या जीवनात चांगल्या मार्गावर चालण्या करीता, विचलित न होण्याकरीता असे अनेक साहित्य मार्गदर्शक महत्वाचे ठरले आहेत. त्यापासूनच प्रेरणा घेऊन मी विचार केला की, मी पण काही असे स्वअनुभवावर आधारीत शब्दसमूह तयार करावे जे जखमेवर मलम, टॉनिक व मार्गदर्शकाचे काम करतील. जे कुणी विचलीत होऊन चुकीच्या मार्गावर गेलेले आहेत त्यांना असे साहित्य चांगल्या मार्गावर आणण्यास मदत करतील. आज जर आम्ही बघितले तर आजच्या सांस्कृतिक प्रदुषनाच्या जिवनात या सर्व वस्तुंचे महत्व पहिल्या पेक्षा जास्त महत्वाचे आहे. कारण आता तुम्हाला मार्गावरुन भटकविण्यासाठी घरातच टि.व्ही. हे माध्यम आहे. ई-मेल, सोशलाईजींग मिडिया व एस.एम.एस. व्दारे आता सहजपणे कुणालाही काही न कळू देता भरपूर असामाजिक गोष्टी करता येऊ शकतात. पुर्वी प्रत्येकाचे जिवन हे संस्कार, नितीमूल्ये, आदर, लाज व त्याग यांच्या धाग्यात बांधलेले असायचे. पण आता या आधूनिक इलेक्ट्रॉनिक्स् मिडियाच्या येण्याने या सर्व गोष्टींची बंधने तुटलेली आहेत. आता आपल्याला काय खायचे?, काय प्यायचे?, कसं दिसायचं?, कसं वागायचं?, काय विकत घ्यायचं? हे सर्व इलेक्ट्रॉनिक्स् मिडिया आपल्याला शिकवीत आहे. इतकचं नाही तर आपले नाते-संबंध कशी असावित हे सुद्धा अनेक मालिकांद्वारे आपल्या सुप्त मनात बसविण्याचे काम सुरु आहे. मला आशा आहे की, या पुस्तकातील काही सुविचार आपल्याला विचलित होण्यापासून थांबवितील व जिवनात काही गोष्टीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतील. जर का तुम्ही जिवनात हारलेले असाल, विखुरलेले असाल तर यातील काही सुविचार तुमच्यासाठी संजिवनीचे काम करु शकतात आणि तुम्हाला यापासून काही लाभ झाला तरच मला असे वाटेल की, माझे लिखाण सार्थक ठरले.

आपला विनम्र

विलास जैन

# शब्दशिल्प®

मराठी सुविचार

## ॥ सूची ॥


| | | |
|---|---|---|
| १) | सुविचार | १. |


हे कार्य नाही क्रांति आहे

दुष्कर्माचा फुगा
आभाळा ऐवढा जरी फुगला
तरी सत्कर्माचे
छोटेसे सुईचे टोक
ते फोडण्यास पुरेसे असते.

घोड्याला लगाम,
बैलाला नाथ व
माणसाला संस्कार
नियंत्रीत करतात.

ढग जरी
धरती वरुन पाणी वाहून
आकाशात घेऊन गेले तरी
थोडीशी स्नेहाची थंड हवा
त्यांना धरतीला पाणी परत
अर्पण करण्यास भाग पाडते.

वादळाने कितीही थैमान घातले
तरी तो स्वप्न उडवून सोबत
घेऊन जाऊ शकत नाही.

अरे ढोलकी जरी
निर्जीव असली तरी
ती दोघी बाजुने
वेगवेगळे आवाज काढते,
मग यालाही हो
आणि त्यालाही हो
म्हणण्याची आम्हा
मानवांची मजबुरी काय?

बेकार म्हणवून स्वत:ला
लाचार न समजता
पुरुषार्थाचा हुंकार फोडून
विजयाचा साक्षात्कार करावा.

समजण्यापेक्षा समजावणे
सोपे असते,
ठेवणीतल्या चार शब्दाने
समोरच्याचा उपचार
करायचा असतो.

विचार करणे विहीर
खोदण्यासारखे असते
पाणी लागेपर्यंत म्हणजेच
मर्म समजण्यापर्यंत खोद काम
सुरुच ठेवावे लागते.

आरश्यात बघून स्वत:ची
प्रशंसा करण्यापेक्षा
लोकांच्या नजरेत
आपली प्रतिमा पाहून
स्वत:चे मूल्य मापन करावे.

पाणी किती वेळ गढूळ राहील
एक ना एक दिवस
गाळ खाली बसणारच.

विचाराची खोलाई व पाण्याची खोलाई
यात फरक एवढाच असतो की,
पहिली काही शब्दात समजते
तर दुसरीला मोजावे लागते.

बोलण्याने युक्ती प्रदर्शन होते व
कार्याने शक्ती प्रदर्शन होते.

सुविचारांच्या सहाय्याने मनुष्य
भवसागरात तरंगतो,
दुर्विचारांच्या ओझ्यामुळे मनुष्य
खोल जाऊन डुंबतो.

अरे वेल कितीही बहरली,
मोठी झाली, फुलली
तरी ती कोणावर
तरी अवलंबून असतेच.

सूर्याकडे डोळे वटारून बघितले
म्हणजे अंधारी येणारच.

शेअर बाजारातील उंचावणारा निर्देषांक
हा समाजात सट्टा खेळण्याची
आणि कमी श्रमात
जास्त पैसा कमविण्याची
प्रवृत्ती वाढते आहे हे सुचवतो.

जगण्याची इच्छा
मेल्याशिवाय जात नाही.
मरणाची इच्छा
जगण्याशिवाय होत नाही.

मेलो मेलो म्हणून ओरडतोस
जिवंत असता तर
मेलो म्हणण्याची पाळी
तुझ्यावर आली नसती.

सुदृढ होण्याची इच्छा होती
म्हणून सशक्त बनलास
मग इच्छा नसतांना
आजारी कसा पडलास.

निसर्गाला सोडून
भौतिकतेच्या मागे
कितीही धावला
तरी शेवटी जाळायला
निसर्गच कामा येतो.

वृक्ष तोडून विकणारे,
हिऱ्याला कोळश्याच्या
भावात विकत आहेत.

नैतिकता तोडनारे,
नैतिकतेला सुविधेनुसार वापरनारे,
नैतिकतेचा आव आणनारे,
चूकीच्या कामात नैतिकता बाळगनारे
हे सर्वजन ज्या नावात बसलेले आहेत
तिलाच छिद्र पाडण्याचे
काम करीत आहेत.

गुलाबाला काटे,
कमळाला चिखल,
माणसाला चंचलता
सर्वश्रेष्ठ होण्यापासून थांबवते.

वाघाने शिकार केल्यानंतर जंगलातील
अनेक प्राणी मेलेल्या प्राण्यावर
ताव मारण्यास येतात
तसेच एखाद्या शुर विराने
केलेल्या कामाचे श्रेय
लाटण्यासाठी समाजातील
अनेक लोक पुढे येतात.

कुत्रा आपल्याच समाजातील
प्राण्यांवर भुंकतो म्हणून
त्यास कुत्रा म्हणतात.

गाढव कोणतेही काम
करत असतांना
फक्त शक्तीचाच
प्रयोग करीतो म्हणून
त्यास गाढव म्हणतात.

कुठल्याही गोष्टीवर विचार करणे
जसे महत्वाचे आहे तसेच
योग्य वेळी ते विचार थांबवणे
सुद्धा महत्वाचे आहे.

विचारांच्या खोलाईत
जास्त शिरल्यास
विषय हरविण्याची
शक्यता असते.

सुगंधामुळे फुलाचे,
खोलाईमुळे तलावाचे
व चांगल्या गुणांमुळे
माणसाचे महत्व वाढते.

विचार विद्युत प्रवाहासारखे असतात,
चांगल्या व वाईट दोन्ही गोष्टी
यामुळे होऊ शकतात.

उदासिनता येते निघून जाते,
काळोख होतो विरून जातो,
वादळ येतो शांत होतो,
पुर येतो वाहून जातो,
संताप येतो कमी होतो,
सांगा बरे या मागे कोण असतो?

उन्हाळ्याने तापून
जर पाण्याची वाफ
केली नाही तर
पावसाळ्यात धो धो पाऊस
कसा कोसळेल?

राजकारणात जनतेचे काम करत
वेळ घालविण्यापेक्षा
वेळ बघून काम करणाऱ्याला
जास्त फायदा होतो.

पावसाळ्यात पडणाऱ्या
सुंदर पावसात
अंघोळ करतांना
उन्हाळ्याने वाफ करून
आकाशात पाठवलेल्या
पाण्याला विसरायचे नसते.

उन्हाने तापावं,
पावसाने कोसळावं
व माणसाने फक्त भिजावं
इथपर्यंतच माणसाचा
सहभाग नसावा.

एखादी छोटी टेकडी चढली
म्हणजे फार मोठे पर्वत चढलो
असे समजणारे लोक
समाजात सध्या फार मोठ्या
प्रमाणात दिसून येतात.

राजकारणात सामर्थ्यापेक्षा समतेला,
कर्तुत्वापेक्षा कावेबाज पणाला,
कौमर्यापेक्षा कामुकतेला,
स्पष्टवक्तेपणा पेक्षा न बोलण्याला
भावनेपेक्षा व्यवहाराला
जास्त महत्व असते.

स्वप्न हे एक असे
भिंग काच असते
जे आपल्याला भविष्य काळ
जवळून बघायला मदत करते.

स्वप्नातून वास्तविकता
जन्माला येते,
वास्तविकतेचा हात धरून
स्वप्न जन्मले पाहिजे.

राजकारणात नितिमत्ता
शोधणे म्हणजेच
समुद्रात सुई
शोधण्यासारखे आहे.

एखादी महत्वाची
वस्तू डोंगरावरुन
खाली पडली म्हणजे
तिच्या मागून
उडी मारायची नसते.

चप्पल कितीही सुंदर
आणि महागडी असली तरी
तिला डोक्यावर ठेवायची नसते.

जशी आपली जिभ ही
कडक आणि शुभ्र दातांनी
वेढलेली असते
तसेच आपले प्रत्येक कार्य
चरित्र्याने वेढलेले असावे.

जगातल्या कोणत्याही पाण्यापेक्षा
डोळ्यातले पाणी कमी
व खारट असूनही
त्याची किंमत जास्त असते.

मार शरीरापेक्षा मनावर
जास्त आघात करतो
म्हणून तो नकोसा वाटतो.

प्रत्येक माणूस जर
न्याय करायला शिकला
तर न्याय मागण्याची
गरज पडणार नाही.

उन्हाळ्यात धुळ उडणार व
पावसाळ्यात चिखल होणारच.

वादळाने आपले थैमान संपवले
म्हणून तो उद्या येणार नाही
असे समजू नका.

शारिरीक कष्ट व दुःख
आईच्या पोटातून बाहेर पडत
असल्यापासून सुरु होतात मग
त्याला का घाबरावे.

आकाशाकडे बघायचे असेल
तर मान उंच करावी लागते
तसेच मोठ्या गोष्टी करण्याकरीता
एका चाकोरी बाहेर
आपली दृष्टी नेऊन बघावे लागते.

चिखल हवा नसल्यास
पावसाळ्याची मजा
सोडावी लागेल.

जीवनाच्या फुग्यात पुण्याईची
गरम हवा भरली म्हणजे
जीवनमान उंचावण्यास
आपोआप मदत मिळते.

कमळ कितीही फुलला,
सुंदर दिसला तरी
त्याला चिखलाला
विसरुन चालणार नाही.

गुलाबाचे काटे जिवनात
चांगल्या वस्तू मिळविण्याकरीता
त्रास सहन करावा लागतो
असे सुचवतात.

स्त्री कितीही माणसासारखी वागली,
राहिली, बोलली तरी
अंगावरचे केस तिला
नकोसे वाटतात.

माणूस कितीही स्त्री सारखा वागला
तरी बाळाचे संगोपन करणे
त्याला नकोसे होईल.

एक वेळ अशी होती
जेव्हा प्राण्यांना माणसाची
दया यावी असे वाटत होते,
आता माणसाला प्राण्यांची
दया यावी असे वाटते.

कधी कधी कायदा बघुन
पळवाटा निघाल्या असे वाटते
तर कधी पळवाटा बघुन
कायदा तयार झाला असे वाटते.

जीवनात काही काळ असा येतो जेव्हा फक्त शांत राहणे, शांती ठेवणे, काही न करणे, सहन करने एवढेच आमच्या हातात असते. अशा वेळी जर काहीही केले तरी वेळ, पैसा व मेहनत वाया जाते.

भिंती मधला खांब दिसत नसतो
खरे म्हणजे खांबच
भिंतीचा आधार असतो
सत्कर्म, संस्कार आणि श्रम
जो करीतो तोच
फुलांचा खरा हक्कदार असतो.

झाड मोठे का माणूस
असा जेव्हा विचार होईल,
तेव्हा सरळ सरळ झाडाला
मोठेपण द्यावे लागेल.

ज्यांच्या भुजात माय भवानी
डोळ्यात आहे पाणी
अजस्त्र ज्यांची वाणी
धर्म ज्यांच्या मनी
सत्कर्म ध्यानी व्हा असे
उत्तुंग व्यक्तिमत्वाचे धनी.

फुलारे फुला काय सांगु तुला
सत्कार तु करणार की
होणार हा सत्कार तुझा
संपूर्ण समाजाला
जो गुंफतो प्रेमात
जाणार आहेस तू त्यांच्या हातात.

विजेचा खांबाला
काँक्रीटच्या गड्ड्यात गाडून सुद्धा
त्याला तारेने बांधावे लागते
या उलट झाडाची उंची, वजन व आकार
जास्त असूनही झाड फक्त मातीत उभा राहतो.
यामध्ये फरक फक्त इतकाच असतो
विजेचा खांब हा बाहेरुन आत आलेला असतो
व झाड जमिनीच्या पोटातून बाहेर आलेले असते.
यावरुन असे समजते
बाहेरुन आलेल्या किंवा उसनवार घेतलेल्या
कोणत्याही गोष्टीला टेक्याची गरज असते,
आतून आलेली कोणतीही गोष्ट
स्वबळावर उभी राहते त्याला
टेक्याची गरज भासत नाही.

जी फळे तुम्हाला आवडली
कमीत कमी त्या फळाच्या तरी
बिया आपण मातीत रोवाव्यात
अशी इच्छा परमेश्वराची आहे
म्हणून त्याने प्रत्येक फळात
बिया दिलेल्या आहेत.

जसे आम्ही प्रत्येक फळामध्ये सिडलेस
(बिया नसाव्या) अशी अपेक्षा करतो
उद्या जर माणसांमध्ये
ही प्रवृत्ती वाढली तर?

नुसत्या वयाने म्हातारपण मिळत नसते
जेव्हा अनुभवाचे चटके हे
बुद्धीला आणि शरीराला पिकवितात
तेव्हा म्हातारपण येते.

जसे झाडाच्या मुळाची
किंमत लावली जात नाही,
जसे पिकाच्या बिजाचे
महत्व समजले जात नाही
तसेच विकासासाठी खपलेल्या
पहिल्या पिढीला विसरले जाते.

काही जन मला मुर्ख समजतात
त्याने मला दुःख होत नाही
त्यांचे विचार आणि दृष्टीकोन
चूकीचा आहे याचे
मला वाईट वाटते.

जेव्हापर्यंत जिवनात पुरुषार्थ
व कामाला अर्थ आहे
तोपर्यंतच जिवन जगणे सोपे होईल.

प्रत्येकाला आपले समजून
अपेक्षेचे डोंगर उभे करण्यापेक्षा
संबंधात एक दूरी ठेवलेली बरी.

निर्लज्जपणात निष्णात झाल्याशिवाय
राजकारणात प्रगती होत नाही.

ना समझ व्यक्तिकडे
भरपूर पैसा येणे
म्हणजे त्याच्या हातात जगातील
मोठे आत्मघातकी
हत्यार लागणे होय.

तुम्ही करत असलेल्या
कार्याच्या निकालावरुन
तुम्ही स्वत:शी किती
प्रामाणिक आहात हे कळते.

वेळेचा अपव्यय हा माणसाचा
सर्वात मोठा न भरुन
येणारा तोटा आहे.

लिंग पिसाट मनोवृत्तीचे वाढणे
हे येणाऱ्या सामाजिक
अस्थिरतेचे लक्षण होय.

सापाला बिळाजवळ
पकडणे सोपे असते,
एकदा का जर
तो जंगलात घुसला,
तर आपले पूर्ण सामर्थ्य
वाया घालवावे लागते.

राजकारणात पंगा
घेणाऱ्यांपेक्षा पाय पकडणारा
अधिक सामर्थ्यवान ठरतो.

कधी कधी मनुष्य
आपोआप घडणाऱ्या गोष्टींना
स्वत: करायला जाऊन
अडचणीत पडतो.

राजकारणात स्वत:च्या
नावाची स्वत: प्रसिद्धी करणे
म्हणजे बसलेल्या
फांदीला तोडणे होय.

पक्ष्यांना दूर उभे राहून
दाणे टाकले तरी
सर्व पक्षी उडून जातात
यावरुन हे लक्षात
ठेवणे गरजेचे असते.
कि पोट भरण्यापेक्षा
जिवाची सुरक्षा मोठी असते.

आजचा निवडूण आलेला
लोकप्रतिनिधी हा मुर्खांचा
सरदार व कर्जबाजारी
सरकारचा प्रतिनिधी आहे.

पाऊस भरघोस पाडण्यासाठी
उन्हाळ्याला अगोदर तापावं लागत.

मिनीमम रिस्क ही प्रवृत्ती
एक दिवस जीवन जगणे थांबवेल.

सामाजिक जीवनात
काम करत असतांना
जेव्हा तुमची प्रतिष्ठा,
करीयर हे महत्वाची असतात
तेव्हा जनता व तुमचे कार्यकर्ते
तुमची मजा घेतात
पण जेव्हा तुम्ही एखाद्या
जनहिताच्या कार्याला
आपल्या प्रतिष्ठेपेक्षा, करीयर पेक्षा
जास्त मानतात तेव्हा तुमचे
कार्यकर्ते व जनता
तुमची पुजा करतात.

युद्धात सर्वस्व गमावणाऱ्याला
किंवा घायाळ झालेल्याला
त्याने काय केले
हे विचारायचे नसते,
या उलट जो स्वत:ला
वरखडाही लागू न देता
परत आला त्याला
हे विचारणे योग्य राहिल.

पुरुषार्थामध्ये अहंकार आला म्हणजे
तो स्पिड ब्रेकरच काम करतो
म्हणजे पुरुषार्थचा स्पिड कमी करतो.

जीवन जगतांना नियती तुम्हाला
कुठे ढकलते आहे हे बघा
स्वत:ला त्या दिशेत वाहून घ्या
म्हणजे कमी कष्टात जास्त काही
मिळवता येईल व जीवनाची
स्वाभाविकता अबाधित ठेवता येईल.

जीवन जगतांना
दृष्टीकोन महत्वाचा आहे,
घरी बसून मच्छरांना
रक्त पाजण्यापेक्षा
तेच रक्त एखाद्या
अशक्त माणसाला
किंवा भारत मातेच्या
रक्षणासाठी वापरले
तर जास्त चांगले होईल.

या धरतीवर आम्ही सदैव राहणार
आहोत या गैरसमजुतीमुळे आम्ही
बऱ्याच लोकांची मने दुखवतो
व कित्येकांशी संबंध बिघडवतो.

जीवनात खालीपणापासून
वाचण्याकरीता कोणत्या तरी गोष्टीचा
व्यासंग असणे महत्वाचे आहे.

जुन्या पिढीने नव्या पिढीला
आव्हान देणे म्हणजे
उतरत्या सूर्याने उगवणाऱ्या सूर्याला
आव्हान देणे होय.

ज्या वेळेस तुमच्याकडे
करण्यासारखे काहीच राहणार नाही
तेव्हा निराशा तुम्हाला
गिळंकृत केल्या शिवाय राहणार नाही.

कार्य सुरु करेपर्यंतच
भय आपल्या डोक्यात असतो
कार्य सुरु झाले म्हणजे
भयाला घाबरुन दूर पळावे लागते.

कार्य न करणाऱ्याचा,
आळस हा जिगरी मित्र,
निष्क्रीयता त्याची प्रेमिका,
व भय हा त्याचा गुरु असतो.

खोटी गोष्ट
कितीही ओरडून,
युक्तीवाद करुन
खरी अथवा सत्य
ठरवता येत नाही.

या जगात नितिमत्तेने वागणे म्हणजे
काट्याने भरलेल्या खडतर जमिनीवर
अनवाणी चालण्यासारखे होय.

संघर्ष हा का, केव्हा व कितपत असावा-

का { अन्याय दूर करण्यासाठी असावा.
अधिकार मिळविण्यासाठी असावा.

केव्हा { आत्मविश्वास असला तर करावा.
स्वत:च्या प्रामणिकतेवर विश्वास
असला तर करावा.

कितपत { शेवटच्या श्वासापर्यंत असावा.
विजय सत्याचा होत राहीपर्यंत असावा.

जिथे मी काही बोलु,
करु किंवा सांगू
शकत नाही त्याला
मी नशिब समजतो.

जिवंत ते शरीर
मेलेले ते प्रेत
पडलेली ती जमीन
पेरलेले ते शेत

सूर्य, चंद्र, पृथ्वी यांना
पर्याय शोधने चूकीचे होईल.

नाहक वाहणारा वारा
मनाला विट आणतो
अवेळी पडणारा पाऊस
प्रत्येकाला नकोसा वाटतो
जास्त पडणारा सूर्यप्रकाश
कित्येकांचे जीवन विझवतो
अशाप्रकारे कोणतीही
गोष्ट प्रमाणाबाहेर व
अवेळी असली म्हणजे
कामी येत नाही.

आधुनिकतेच्या आडमध्ये संस्काराला
जर दूर सारले तर
मानव जातीचा ऱ्हास होईल.

संस्काराविना माणसाची कल्पना करणे
फार त्रासदायक होईल.

मुलगा किंवा मुलगी
शिकुन सवरून घरी आली
म्हणजे सगळे काही
पार पडले असे समजु नये.
त्यानंतर त्याचा किंवा तिच्या
भावनांनमध्ये येऊन केलेल्या चूका,
कमविन्यात अतीघाईमुळे केलेल्या चूका,
दुनियादारी शिकतांना ओढवलेला अपमान
व शेवटी माणूस बनेपर्यंत केलेल्या सर्व
अप्रिय घटनांना सामोरे जाणे
अजून बाकी असते.

मरणाऱ्यासाठी किती रडावं
अडखडणाऱ्या करीता किती पडावं
निष्क्रीयते बरोबर किती सडावं
सोबत चालणाऱ्या बरोबर किती थांबावं
याला एक मर्यादा असते.

जेव्हा एखादा व्यक्ति
तुमची निंदा करतो
तेव्हा तो तुमची
संकटाशी लढण्याची
ताकद वाढवतो असे समजावे.

बीजाला अंकुरीत होण्याकरीता फक्त
थोडी माती आणि काही
थेंब पाण्याची आवश्यकता असते.
काही ग्रॅम वजनापासून भला मोठा
वृक्ष होण्याची क्षमता
त्याच्या मुळात असतेच.

प्रलयापेक्षा महाभयंकर घटना
त्या दिवशी घडेल
जेव्हा जमीनीत टाकलेले
बीज उगवणार नाही
किंवा जमीन नापीक होईल.

बरेच जन या जगात
आपली चूकीची गोष्ट बरोबर आहे
हे सिद्ध करण्याकरीता
आपल्या बहुमूल्य जीवनाचा
बराच वेळ वाया घालवतात.

विटा आणि सिमेंटने प्रार्थना स्थळे
मोठी बनत नाहीत
प्रार्थना स्थळे ही आस्था(श्रद्धा)
आणि विश्वासाने म्हणजेच
भरवशाने मोठी होतात.

आधी आई मोठी होती आणि
स्त्री लहान आता उलटे आहे.

आधी आई होणे स्त्रीला वरदान वाटत होते
आता तो शाप वाटतो.

आई होणे शाप आहे असे समजणारी
स्त्री फक्त शरीराने स्त्री आहे.

मुलांना त्यांच्या
चूकीबद्दल न रागवता
अनैतिक, अवैध व असंगत
गोष्टी केल्यास रागवावे.

मुलांमध्ये ऊर्जा जास्त असल्यामुळे
त्यांना जीवन छोटेसे
व सुखकर वाटते.

धाडस, साहस व स्वप्न हे
सकारात्मक ऊर्जे सोबतच असावेत.

कुठलीही गोष्ट सुरु करतांना
जरी विचार केला नाही
तरी चालेल पण त्याचा
शेवट काय होईल याचा
नक्कीच विचार केला पाहिजे.

आज भरपूर लोक
गोंधळलेल्या रस्त्यावरचे
भरकटलेले प्रवासी आहे.

पहले लज्जा ही स्त्री
वर वरचढ होती
आता स्त्री लाजेवर
वरचढ झालेली आहे.

वेळ, साधन आणि सचोटी
हे आपण ज्या प्रमाणात
कामाला लावतो
त्याच प्रमाणात
अपेक्षा करावी.

अपेक्षा पुर्ण होणे
व न होणे
यावरच सुख दु:ख
अवलुंबन असते.

सुख दु:ख हे
मानसिक आणि शारीरिक
या दोनच गटात
विभाजित करु शकतात.

सुखाचा उपभोग म्हणजे आनंद,
अपेक्षेप्रमाणे परिस्थिती
निर्माण होणे म्हणजेच सुख.
वेळ, मेहनत, सचोटी आणि साधन
यांचे योग्य मिश्रणांमुळे
तयार झालेली परिस्थिती
म्हणजे समाधान.

संस्कारच माणूस आणि
जनावरामध्ये फरक करतो
कित्येक माणसे ही
जनावरासारखी वागतात
तेथेच कित्येक जनावरे
हे माणसासारखे वागून
आपल्याला आश्चर्यचकीत करतात.

सुख, आनंद, समाधान या गोष्टी
पुण्य, पाप, मेहनत, चांगली कामे,
नशिब यावर अवलंबुन नसून
वेळ सचोटी, साधन आणि अपेक्षा
त्यांच्या यथायोग्य मिश्रणांवर अवलंबुन असतात.

कोणत्याही कामाला पुर्ण करण्यासाठी
वेळेचा कच्चा माल योग्य प्रमाणात
टाकणे शिकले पाहिजे तरच
अपेक्षेप्रमाणे कामे होतील.



## माझी ओळख

"मी एक ऊर्जा आहे. निरंतर वाहणारी ऊर्जा.. कोणत्या लिंग, भेद, धर्म आणि आकारात आपल्या समोर उपस्थित आहे, फक्त त्यानेच माझी ओळख समजू नका. आपण माझ्या ज्या कार्यांना विकास, उत्साह, आनंद, कार्यक्षमता, आस्था, प्रोत्साहन अशा अनेक मोठ्या शब्दांनी संबोधता ती फक्त माझ्या जीवनाची धारा आहे. मी अनेक वेळा तुमच्या जीवनात येतो आणि निघून जातो. काही वेळ तुमच्या सोबत चालतो त्याला तुम्ही माझे सहकार्य समजता. कृपया हे जाणून घ्या की आपल्यामुळेच माझा जीवनाचा मार्ग सहज व आनंदादायी बनतो. अनेक वेळा आपल्याला माझ्यामुळे जाणता किंवा न जाणता काही लाभ होत असेल, काही वस्तू प्राप्त होत असतील. कृपा करून त्या करीता मला धन्यवाद म्हणू नका. कारण मी बनलाच त्या करीता आहे. हो, पण जर माझ्याने काही चूक झाली असेल तर मला आपण दयाळू ह्रदयाने माफ कराल अशी आशा बाळगतो."

धन्यवाद !....

आपणापासून मला प्रेरणा मिळते !

विलास जैन

## हे कार्य नाही क्रांति आहे

किंमत ₹ - १००/-

# आभार

त्या सर्व व्यक्तींचे जे
चांगले आहेत,
चांगले होण्यासाठी सदैव
तत्पर असतात,
सदैव चांगले व्हावे यासाठी
प्रार्थना करतात,
कुणाचेही चांगले करण्याकरीता
भरपूर मेहनत घेतात,
चांगल्या व्यक्तींची मनापासून
प्रशंसा करतात
आणि प्रत्येक वेळी चांगल्या
कामामध्ये
तन-मन-धन
देण्यासाठी तयार असतात.

आपले मन:पूर्वक आभार
**विलास जैन**